सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन १८६२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४**

# बाजार व जत्रा अधिनियम, १८६२

**( दिनांक १८ मे २००५ पर्यंत सुधारित )**

## BOMBAY ACT No. IV OF 1862

# The Markets and Fairs Act , 1862

( *As modified upto 18th May 2005* )

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[ किंमत : रु. ५ ]

# बाजार व जत्रा अधिनियम, १८६२

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| | उद्देशिका | पृष्ठ |
| | कलमे .. .. .. | .. १ |
| १. | परवानगीशिवाय कोणताही नवीन बाजार किंवा जत्रा स्थापन न करणे लायसन्सशिवाय स्थापन करण्याच्या प्रयत्नाबद्दल शास्ति. | .. २ |
| २. | नवीन बाजार व जत्रा स्थापन करावयाची इच्छा असलेल्या व्यक्तीने दंडाधिकाऱ्याकडे अर्ज करणे. | .. २ |
| | अर्जातील मजकूर. .. .. .. | .. २ |
| ३. | अर्जावर कार्यपद्धती .. .. .. | .. ३ |
| | उद्घोषणा प्रसिद्ध करणे .. ... .. | .. ३ |
| | शेजारील बाजाराच्या मालकाला नोटीस देणे .. | .. ३ |
| ४. | स्थापनेस परवानगी देणारा आदेश .. .. | .. ३ |
| | आक्षेपांची चौकशी. .. .. .. | .. ३ |
| ५. | बाजार भरविण्याच्या दिवसात बदल .. .. | .. ३ |
| ५-क | दंडाधिकाऱ्याने आदेश देण्यापूर्वी संचालक, कृषि बाजार व ग्रामीण अर्थव्यवस्था याचा किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याचा सल्ला घेणे. | .. ४ |
| ५-ख | एखाद्या बाजार किंवा एखादी जत्रा ५ मैलांच्या आत अगोदरच स्थापन झालेली असली तर परवानगी नाकारणे.. .. | .. ४ |
| ५-ग | सार्वजनिक हिताच्या दृष्टीने विद्यमान बाजार किंवा जत्रा बंद करण्याचा अधिकार. .. .. .. | .. ४ |
| ५-घ | विद्यमान बाजार किंवा जत्रा बंद करण्याची कार्यपद्धती .. | .. ५ |
| ६. | अपील .. .. .. | .. ६ |
| ७. | आदेशाचे उल्लंघन करणे, तो न पाळणे किंवा त्याला विरोध करणे याबद्दल शास्ति. .. .. .. | .. ६ |
| ७-क | प्रत्यायोजन .. .. .. | .. ६ |
| ८. | व्याप्ती .. .. .. | .. ६ |
| ९. | अर्थउकल व व्यावृत्ती .. .. .. | .. ६ |
| १०. | (निरसित) .. .. .. | .. ७ |
| ११. | (निरसित) .. .. .. | .. ७ |

## सन १८६२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४[१]
## [ बाजार व जत्रा अधिनियम, १८६२ ]†

दिनांक २४ एप्रिल १८६२

हा अधिनियम पुढील अधिनियमांन्वये अंशतः निरसित करण्यात आला :—

सन १८७३ चा अधिनियम क्रमांक १२.

सन १८७६ चा अधिनियम क्रमांक १२.

पुढील अधिनियमांन्वये अंशतः निरसित करण्यात व सुधारण्यात आला :—

सन १८८६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३.

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम याअन्वये अनुकूलन, फेरबदल व सुधारणा करण्यात आल्या :—

भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश.

सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७.*

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१.

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८४.

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

**बाजार व जत्रा यांची स्थापना करणे [२][ व त्या बंद करणे ] याबाबत विनियमन करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** पूर्वी स्थापना करण्यात आलेले बाजार व जत्रा यांच्या जागांच्या जवळपास नवीन बाजार व जत्रा स्थापना केल्यामुळे असे नवीन व पूर्वीच स्थापन केलेले बाजार व जत्रा यांच्या जमिनीच्या मालकांमध्ये वाद उपस्थित होतात आणि अशा विवादांमुळे वारंवार शांततेचा भंग होतो. व [३][अशा बाजारात व जत्रामध्ये] नेहमी येणाऱ्यांची अत्यंत गैरसोय होते ; उद्देशिका.

---

[१] उद्देश व कारणे यांचे निवेदन प्रसिद्ध करण्यात आले नव्हते. मांडण्यात आलेल्या विधेयकासाठी **मुंबई शासन राजपत्र,** १८८२, पुरवणी, पृ. ४९, (इंग्रजी), प्रवर समितीच्या अहवालासाठी वरील राजपत्राचे पृ. ७७, (इंग्रजी) पहा आणि परिषदेतील कार्यवाहीसाठी वरील राजपत्राची पृष्ठे ४९, ७६ व ९५ पहा. संक्षिप्त नाव हे, मुंबई संक्षिप्त नाव अधिनियम, १९२१ (सन १९२१ चा मुंबई २) याअन्वये देण्यात आले.

[२] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८४ याच्या कलम ३ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे "अशा बाजारात व जत्रेत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

† हा अधिनियम सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८४ याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी मुंबई राज्याच्या ज्या भागात लागू नव्हता त्या भागात लागू करण्यात आला आणि तेथे तो अंमलात राहील. मात्र यात बृहन्मुंबईचा अंतर्भाव असणार नाही. (१९५८ चा मुंबई ८४, कलम २ पहा.).

* हा अधिनियम पुन्हा अधिनियमित करण्यात आला आहे आणि उक्त अधिनियमाचे कलम ९ व अनुसूची 'ई' द्वारे केलेल्या सुधारणा सन १९४७ चा मुंबई अधिनियम ५२, कलम २ द्वारे अंमलात असण्याचे चालू ठेवले आहे.

(शा.म.मु.) एच ४१६१–२ (६,०६७—११-२००६)

आणि ज्याअर्थी, सर्वसाधारण जनतेच्या हिताच्या दृष्टीने विद्यमान बाजार किंवा जत्रा बंद करण्यासाठी देखील तरतूद करणे इष्ट आहे ; ] **त्याअर्थी,** पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

**परवानगीशिवाय कोणताही नवीन बाजार किंवा जत्रा स्थापन न करणे.**

१. [१][ * * * ] कोणत्याही व्यक्तीने जिल्हाच्या दंडाधिकाऱ्याच्या लेखी परवानगीशिवाय नवीन बाजार किंवा जत्रा स्थापन करता कामा नये.

**लायसन्सशिवाय स्थापन करण्याच्या प्रयत्नाबद्दल शास्ती.**

एखाद्या व्यक्तीने अशा लायसन्सशिवाय बाजार किंवा जत्रा स्थापन करण्याचा प्रयत्न केल्यास ती [२][ प्रथमवर्ग दंडाधिकाऱ्याकडून] सिद्धापराध. ठरविण्यात आली. असता, दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या शिक्षेस किंवा दंड भरण्यास कसूर केल्यास जास्तीत जास्त दोन [३][ * * * ] महिन्यापर्यंत असू शकेल अशा कोणत्याही कालावधीच्या साध्या कैदेच्या शिक्षेस पात्र ठरेल.

**नवीन बाजार व जत्रा स्थापन करावयाची इच्छा असलेल्या व्यक्तीने दंडाधिकाऱ्याकडे अर्ज करणे.**

२. एखाद्या व्यक्तीला नवीन बाजार किंवा जत्रा स्थापन करावयाची असेल तर तिने त्या जिल्ह्याच्या दंडाधिकाऱ्याकडे लेखी अर्ज केला पाहिजे.

**अर्जातील मजकूर.**

अर्जात पुढीलप्रमाणे मजकूर विनिर्दिष्ट करावा :—

अशा नवीन बाजार किंवा जत्रा ही ज्या जागी स्थापन करावयाचे योजिले असेल त्या जागेचे नाव ; बाजार किंवा जत्रा ज्या दिवशी भरणार असेल ते दिवस

निकटतम विद्यमान बाजार किंवा जत्रा ज्या ठिकाणी भरत असेल त्या जागेचे नाव व ती ज्या दिवशी भरते ते दिवस ;

इंग्रजी मैलांमध्ये या दोन जागांमधील अंतर ; आणि

अर्जदाराची ज्या कारणांसाठी नवीन बाजार किंवा जत्रा स्थापन करण्याची इच्छा असेल ती कारणे.

---

[१] " हा अधिनियम पारित करण्यात आल्यानंतर " हा मजकूर निरसन अधिनियम, १८७३ (१८७३ चा १२) अन्वये निरसित करण्यात आला.

[२] मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ३) अनुसूची " ब " द्वारे दंडाधिकाऱ्याकडून या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले. ही अनुसूची, मुंबईचा सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४ (१९०४ चा मुंबई १) यांचे परिशिष्ट म्हणून छापण्यात आली आहे.

[३] मुंबई सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ३) याद्वारे कॅलेंडर हा शब्द वगळण्यात आला.

३. [१][अर्ज मिळाल्यानंतर दंडाधिकाऱ्यास, या कलमाच्या व कलम ५(अ) च्या तरतुदीस अधीन राहून] अर्जदाराने नमूद केलेल्या जागी बाजार किंवा जत्रा स्थापन करण्याची अर्जदाराची इच्छा असल्याचे व ती ज्या दिवशी भरण्याचा इरादा असेल ते दिवस नमूद केलेली उद्घोषणा करता येईल व ज्या कोणत्याही व्यक्तीचा बाजार किंवा जत्रा स्थापन करण्यास कोणताही आक्षेप असेल तिने आपले आक्षेप उद्घोषणेच्या तारखेपासून सहा आठवड्यांच्या आत लेखी दाखल करावेत असे कळविता येईल : अर्जावर कार्यपद्धती.

[२][ परंतु, दंडाधिकाऱ्यास उद्घोषण न करता कारणे लेखी नमूद करून, संक्षिप्त चौकशी करून अर्ज फेटाळून लावता येईल.]

[३][ उद्घोषणा काढण्यात आली तर] ज्या गावात किंवा ज्या गावाजवळ अथवा शहरात किंवा शहराजवळ नवीन बाजार किंवा जत्रा भरविण्याचे येजिले असेल त्या गावातील किंवा शहरातील ठळक जागी [३][ ती लावली पाहिजे] व तिची एक प्रत ज्या पोलीस ठाण्याच्या अधिकारक्षेत्रात ते गाव किंवा शहर असेल त्या पोलीस ठाण्यात व दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयात लावण्यात आली पाहिजे. उद्घोषणा प्रसिद्ध करणे.

नवीन बाजार किंवा जत्रा ज्या जागी स्थापन करावयाचे योजिले असेल त्या जागेपासून [४][सहा मैल] अंतराच्या आत एखाद्या विद्यमान बाजार अथवा जत्रा सद्या भरते असे दिसून आल्यास दंडाधिकाऱ्याने असा बाजार किंवा जत्रा ज्या जागेत भरत असेल त्या जागेच्या मालकावर उद्घोषणेच्या आशयाची नोटीस बजावण्याची व्यवस्था केली पाहिजे. शेजारील बाजाराच्या मालकास नोटीस देणे.

उद्घोषणा किंवा नोटीस (तशी असल्यास) ती [५][ शासनाच्या खर्चाने ] देण्यात किंवा बजावण्यात येईल.

४. जर, उद्घोषणेत किंवा नोटिशीत (तशी असल्यास) विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीत नियोजित बाजार किंवा जत्रा यांच्या स्थापनेविषयी कोणताही आक्षेप घेण्यात आला नाही तर, ती स्थापन करण्यास परवानगी देणारा आदेश जिल्ह्याच्या दंडाधिकाऱ्याने काढला पाहिजे. स्थापनेस परवानगी देणारा आदेश.

जर विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत कोणताही आक्षेप घेण्यात आला तर, जिल्ह्याच्या दंडाधिकाऱ्याने आक्षेपांची चौकशी केली पाहिजे आणि प्रकरणांच्या परिस्थितीनुसार त्यास योग्य वाटेल असा आदेश काढला पाहिजे. आक्षेपांची चौकशी.

[६][५. दंडाधिकाऱ्यास, अर्ज मिळाल्यानंतर किंवा इतर रीतीने व त्यास योग्य वाटेल अशी चौकशी (कोणतीही असल्यास) केल्यानंतर कलम ४ अन्वये परवानगी देण्यात आलेला बाजार किंवा जत्रा भरविण्याच्या दिवसात बदल करता येईल. वाढ करता येईल किंवा ते कमी करता येतील. बाजार भरविण्याच्या दिवसात बदल.

---

[१] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम २ (१) अन्वये " अर्ज मिळाल्यावर दंडाधिकारी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २ (२) अन्वये हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २ (३) अन्वये " उदघोषणा चिकटवण्यात आली पाहिजे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २ (४) अन्वये " चार मैल " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २ (५) अन्वये " अर्जदाराच्या खर्चाने " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ३ अन्वये ही कलमे समाविष्ट करण्यात आली.

दंडाधिकाऱ्याने आदेश देण्यापूर्वी संचालक, कृषि बाजार व ग्रामीण अर्थव्यवस्था याचा किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याचा सल्ला घेणे.

**५-क.** †मुंबई कृषि उत्पन्न बाजार अधिनियम, १९३९ यात उल्लेख केलेल्या [१][ * * * * ] संचालक कृषि बाजार व ग्रामीण अर्थव्यवस्था यांचा किंवा याबाबतीत त्यांनी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याची [२][ किंवा राज्य शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याचा] सल्ला घेतल्याखेरीज जिल्ह्याच्या दंडाधिकाऱ्याने कलम ३, ४, [३][५, ५क किंवा ५ड] ह्या अन्वये कोणताही आदेश देता कामा नये.

एखादा बाजार किंवा एखादी जत्रा ५ मैलांच्या आत अगोदरच स्थापन झालेली असली तर परवानगी नाकारणे.

**५-ख.** ज्या जागी नवीन बाजार किंवा जत्रा स्थापना करावयाचे योजिले असेल त्या जागेपासून पाच मैलाच्या आत एखादा बाजार किंवा जत्रा असेल तर दंडाधिकाऱ्यास असा नवीन बाजार किंवा जत्रा स्थापन करण्यास परवानगी नाकारता येईल.

सार्वजनिक हिताच्या दृष्टीने विद्यमान बाजार किंवा जत्रा बंद करण्याचा अधिकार.

[४][**५-ग** जिल्हा दंडाधिकाऱ्यास, विद्यमान बाजार किंवा जत्रा बंद करण्यासाठी या अधिनियमान्वये त्याच्याकडे अर्ज करण्यात आला असता—

(क) शांततेचा भंग होण्यास प्रतिबंध करण्यासाठी किंवा अशा बाजारात किंवा जत्रेत नेहमी येत असलेल्या लोकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होऊ नये म्हणून, किंवा

(ख) धार्मिक पूजेअर्चेची कोणतीही सार्वजनिक जागा, शैक्षणिक परिसंस्था, वसतिगृह, रुग्णालय, शुश्रूषागृह किंवा इतर सार्वजनिक ठिकाण, ही अशा बाजाराच्या किंवा जत्रेच्या जवळ असल्यामुळे व बाजार किंवा जत्रा भरविल्याने अशा सार्वजनिक जागेस त्यापासून उपद्रव होत असल्यामुळे ; किंवा

(ग) सार्वजनिक आरोग्य, लोकांची सोय किंवा सुरक्षितता किंवा रहदारीचे योग्य विनियमन या कारणासाठी ;

---

[१] मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ अन्वये " मुंबई राज्याचे " हे शब्द वगळण्यात आले.

[२] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८४ चे कलम ५ (२) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ५ (१) अन्वये " किंवा ५ " या शब्दाऐवजी व आकड्याऐवजी हे आकडे, अक्षरे व शब्द दाखल करण्यात आले.

[४] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८ च्या कलम ६ अन्वये ५-ग व ५-घ ही कलमे समाविष्ट करण्यात आली.

† मुंबई कृषि उत्पन्न बाजार अधिनियम, १९३९ हा सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० अन्वये निरसित करण्यात आला.

असा बाजार किंवा जत्रा नेहमीकरिता किंवा आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीकरिता बंद करणे आवश्यक आहे अशी त्याची खात्री झाल्यास, लेखी आदेश देऊन, त्यात नमूद करण्यात आलेल्या तारखेपासून, असा बाजार किंवा जत्रा नेहमी करता किंवा विनिर्दिष्ट कालावधीकरता बंद करता येईल आणि तो बाजार वा ती जत्रा अशा ठिकाणी भरविण्यात येता कामा नये असा निर्देश देता येईल :

परंतु, कलम ५-ड मध्ये दिलेली कार्यपद्धती अनुसरल्याखेरीज, दंडाधिकाऱ्याने कोणताही आदेश देता कामा नये.

**५-घ.** (१) निकटपूर्वीच्या कलमान्वये विद्यमान बाजार किंवा जत्रा बंद करण्यासाठी करावयाच्या अर्जात पुढील गोष्टी विनिर्दिष्ट केल्या पाहिजेत :--- विद्यमान बाजार किंवा जत्रा बंद करण्याची कार्यपद्धती.

विद्यमान बाजार किंवा जत्रा ज्या जागी भरविण्यात येत असेल त्या जागेचे नाव ;

ज्या ज्या दिवशी तो/ती भरविण्यात आली असेल ते दिवस ;

जेथे इतर कोणताही बाजार किंवा जत्रा भरविण्यात येत असेल किंवा भरविण्याचे प्रस्तावित केले असेल त्या ठिकाणाच्या जवळ असलेल्या जागेचे नाव ;

तो बाजार किंवा ती जत्रा ज्या ज्या दिवशी भरविण्यात येत असेल किंवा भरविण्याचे प्रस्तावित केले असेल ते दिवस ;

त्या दोन जागांमध्ये किती मैल अंतर आहे ते ; आणि

विद्यमान बाजार किंवा जत्रा बंद करण्याची कारणे.

(२) असा अर्ज मिळाल्यावर, जिल्हा दंडाधिकाऱ्याने एक उद्घोषणा काढली पाहिजे. अशा उद्घोषणेत, विद्यमान बाजार किंवा जत्रा बंद करण्याबद्दल त्याच्याकडे अर्ज करण्यात आला होता ही गोष्ट व तसे करणे का भाग आहे त्याची कारणे नमूद केलेली असली पाहिजेत. आणि बाजार किंवा जत्रा भरविण्यात ज्यांचा हितसंबंध असेल किंवा अशा रीतीने बाजार किंवा जत्रा बंद करण्यात ज्यांचा कोणताही आक्षेप असेल अशा सर्व व्यक्तींना उद्घोषणेच्या तारखेपासून सहा आठवड्यांच्या आत आपले आक्षेप दंडाधिकाऱ्यास लेखी सादर करण्यास सांगितलेले असले पाहिजे. जिल्हा दंडाधिकाऱ्याने उद्घोषणेत समाविष्ट असलेल्या मजकुराबाबतची एक नोटीस देखील, बंद करावयाचा बाजार किंवा जत्रा ज्याजमिनीवर भरविण्यात येत असेल त्या जमिनीच्या मालकावर तसेच, अशा बाजाराच्या किंवा जत्रेच्या मालकावर बजावण्याची व्यवस्था केली पाहिजे व अशा नोटिशीत, असा बाजार किंवा जत्रा का बंद करण्यात येऊ नये याबद्दलचे कारण, नोटिशीच्या तारखेपासून सहा आठवड्यांच्या आत दर्शविण्यात सांगितलेले असले पाहिजे :

परंतु, जिल्हा दंडाधिकाऱ्यास, उपरोक्त प्रमाणे, उद्घोषणा आणि नोटीस न काढता, कारणे लेखी नमूद करून तो अर्ज संक्षिप्तरीत्या फेटळता येईल.

(३) जर उद्घोषणा काढण्यात आली तर, बंद करावयाचा बाजार किंवा जत्रा ज्या गावात किंवा शहरात किंवा ज्या गावाजवळ किवा शहराजवळ भरविण्यात आली असेल त्या गावातील किंवा शहरातील ठळक जागी ती लावली पाहिजे आणि तीची एक प्रत, ज्या पोलीस ठाण्याच्या अधिकारक्षेत्रात असे गाव किंवा शहर असेल त्या पोलीस ठाण्यात लावली पाहिजे.

(४) ती उद्घोषणा व नोटीस (तशी असल्यास) शासनाच्या खर्चाने काढण्यात व बजावण्यात येईल.

(५) जर उद्घोषणेत व नोटीशीत विनिर्दिष्ट केलेल्या अवधीच्या आत बाजार किंवा जत्रा बंद करण्यासंबंधी कोणताही आक्षेप सादर करण्यात आला नाही तर, ताबडतोब, आणि जर अशा अवधीच्या आत कोणताही आक्षेप सादर करण्यात आला तर, जिल्हादंडाधिकाऱ्याने त्या आक्षेपांची चौकशी केली पाहिजे व त्यानंतर त्या प्रकरणाच्या परिस्थितीत योग्य वाटेल असा आदेश दिला पाहिजे.].

अपील. [१][**६.** कलम ३, ४, ५, ५-क किंवा ५-ड या अन्वये जिल्हा दंडाधिकाऱ्याने दिलेल्या प्रत्येक आदेशाविरूद्ध, राज्य शासन याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा अधिकाऱ्याकडे (ज्याचा या कलमात, यापुढे " अपील प्राधिकारी असा निर्देश केला आहे ") सहा आठवड्यांच्याआत अपील करता येईल. जिल्हा दंडाधिकाऱ्याने दिलेला आदेश हा, अपील प्राधिकाऱ्याकडे केलेल्या अपीलास व अपील प्राधिकाऱ्याने अपीलावर दिलेल्या निर्णयास अधीन राहून, अंतिम असेल].

आदेशाचे उल्लंघन करणे, तो न पाळणे किंवा त्याला विरोध करणे याबद्दल शास्ती. **७.** जी व्यक्ती या अधिनियमान्वये योग्य रीतीने करण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करील, तो पाळणार नाही किंवा त्याला विरोध करील, अशी प्रत्येक व्यक्ती दोनशे रुपयापर्यंत असू शकेल इतक्या दंडास किंवा दंड न दिल्यास, दोन [२][* * * ] महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या [२][* * * ] कैदेच्या शिक्षेस पात्र होईल.

प्रत्यायोजन. [३][**७-क.** जिल्हा दंडाधिकाऱ्यांस, या अधिनियमाखालील त्याचे अधिकार, महालकऱ्याच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे, अशा अधिकाऱ्याच्या अधिकारितेतील संपूर्ण क्षेत्राच्या संबंधात किंवा त्याच्या एखाद्या भागाच्या संबंधात प्रत्यायोजित करता येतील.]

व्याप्ती. [४][**८.** हा अधिनियम, बृहन्मुंबई खेरीजकरून [५][ संपूर्ण महाराष्ट्र राज्यास ] लागू असेल.]

अर्थउकल व व्यावृत्ती. [६][**९.** [७][या अधिनियमात, संदर्भावरून इतर रीतीने अर्थ लावणे आवश्यक नसेल तर,—

(१) " बाजार " या संज्ञेत,—

(अ) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या स्थानिक प्राधिकरणासंबंधी कोणत्याही कायद्याअन्वये स्थानिक प्राधिकरणांच्या मालकीचा असलेला, त्याच्याकडून व्यवस्था ठेवण्यात येत असलेला किंवा त्याने स्थापन केलेला किंवा त्याच्याकडून विनियमन करण्यात येत असलेला कोणताही बाजार ;

(ब) पवित्र मंदिराच्या उद्घाटनाच्या वेळी जमलेला किंवा त्याच्याशी संबंध असलेला लोकांचा जमाव किंवा जत्रा अथवा बाजार यांचा भाग नसलेल्या अशा कोणत्याही इतर धार्मिक उत्सवाच्या किंवा समारंभाच्या वेळी जमलेला किंवा त्यांच्याशी संबंधित असलेला लोकांचा जमाव ;

यांचा अंतर्भाव होत नाही.

---

[१] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८४, कलम ८ द्वारे मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[२] मुंबई सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८८६ (१८८६ चा ३) याअन्वये, अनुक्रमे " कॅलेंडर " व " कोणत्याही प्रकारच्या " हे शब्द वगळण्यात आले.

[३] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम ५ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८४, कलम ८ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[५] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये " मुंबई राज्यास " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम ६ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[७] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८४, कलम ९ (१) अन्वये " या अधिनयमाच्या प्रयोजनासाठी मार्केट " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1][ (२) "जिल्हादंडाधिकारी" किंवा "जिल्ह्याचा दंडाधिकारी" या संज्ञेत, राज्य शासन कोणत्याही प्रदेशाच्या संबंधात याबाबत विनिर्दिष्ट करील अशा इतर कोणत्याही दंडाधिकाऱ्याचा समावेश होतो. "]

**१०.** [राज्य शासनाच्या सर्वसाधारण अधिकारांची व्यावृत्ती] हे कलम १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१ पहिली अनुसूची, या अन्वये निरसित करण्यात आले.

**११.** ["दंडाधिकारी" या संज्ञेचा अर्थ] हे कलम १८८६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ या अन्वये निरसित करण्यात आले.

---

[१] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्र. ८४, कलम ९ (२) अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई